# करवीर संस्थानचे शिल्पकार :– राजर्षी शाहु छत्रपती महाराज

**सुरज पांडूरंग वडर** सहायक प्राध्यापक (संशोधक विदयार्थी) मु.पो.सांगवडेवाडी, ता.करविर, जि.कोल्हापुर
ईमेल surajvadar95@gmail.com मो न :– 9673899647

**सारांश :–**

18 व्या शतकाचा उत्तरार्धात व 19 व्या शतकाच्या पुर्वार्धात महाराष्ट्रात प्रबोधन सुधारणा व परिवर्तनाची नविन पहाट उगवली महाराष्ट्राच्या दक्षिण भागात ब्रिटीश भारतातील मुंबई प्रांताची संलग्न असणारे करवीर संस्थान आकारमान, क्षेत्रफळ , लोकसंख्या व उत्पन्न अंगाने व तुलनेने लहान असलेले हे संस्थान आज जगप्रसिध्द आहे. या संस्थानात 1894 ते 1922 या कालावधीत व्यापक व सर्व समावेक्षक अशी विकासकामे व लोकाभिमुख योजना यशस्वीपणे राबविण्यात आल्या. राजर्षी शाहु राजेंनी करवीर संस्थानचा सर्वागीण विकास केला.या विकास पर्वाला सामाजिक न्यायाची च सर्वोदयाची जोड होती. म्हणुनच त्यांना करवीर संस्थानचे शिल्पकार असे म्हणतात.प्रस्तुत शोधनिबंध हा शाहुराजेनी त्यांच्या कार्यकाळात केलेली विकासकामे व त्याचे दुरगामी परिणाम व प्रभाव स्पष्ट करणे करवीर संस्थान हे राजेशाही प्रवर्गातील असुनही येथील राज्यकारभार लोककल्याणकारी व बहुजण कल्याणकारी ठरला. सदर शोधनिबंध करवीर संस्थानचे शिल्पकार म्हणुन शाहुराजे किती दुरदृष्टीचे व प्रजाहितदक्ष यावर संदर्भासहित प्रकाश टाकला जातो. शोध निबंधाचे सर्व लेखन हे स्वहस्तलिखित व अस्सल आहे.

**प्रमुख शोधशब्द** :– सामाजिक न्याय, प्रजाहितैषु, सर्वादय,अंत्योदय, बहुजनहिताय,सत्यशोधक परंपरा, राजाश्रय,क्रांतीकारी निर्णय,सामाजिक परिवर्तन , दुरदृष्टी.

**प्रस्तावना (उददेश ) :–**

भारतामध्ये ब्रिटींश राजवटीच्या काळात सुमारे 600 संस्थाने होती. संपुर्ण भारतीय उपखंडात ही संस्थाने पसरली होती. बहुतांश संस्थाने व राजेशाही व एक चालकनुवती होती. उत्तर व मध्य भारतातील संस्थाने, दक्षिण भारतातील संस्थाने आकाराने व विस्ताराने प्रचंड मोठी होते.यासर्व वसाहतवादी पार्श्वभुमीवर फक्त बडोदा आणि कोल्हापुर हे दोन संस्थाने सार्वाधिक गौरवली जातात. आदर्श मानली जातात. या संस्थानाची कार्यपध्दती राज्यकारभार , व कार्यक्रम, व प्रकल्प ही सर्वसमान्यांच्या हितसाठी होती. या संस्थांनाचा कारभार हा सर्व सामान्य केंद्रीत होता.आज एकविसाव्या शतकाच्या दुस–या दशकातही या संस्थांचा अभ्यास केला जातो. ही दोन संस्थांने आज आदर्श राज्यकारभाराची मानदंड मानली जातात. आजही भारतभरातील सर्व शासकीय धोरणात या संस्थांनाच्या विकासकामाचा आढावा घेतला जातो.

**विशेषतः** सामाजिक न्याय, जातीय अस्पृश्यता निर्मुलन, स्त्री सबलीकरण, कामगार कल्याण , शेतकरी हित , शिक्षणाचे सर्व समाविशेकरण , आरोग्य व्यवस्था , कला, क्रिडा , साहित्य व संस्कृती , सहकार , उदयोग , बाजारपेठ, वाहतुक या क्षेत्रातील झालेली कार्ये सार्वकालिक व दुरगामी प्रभावी ठरलेली आहेत.

बडोदा नरेश महाराजा सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहु राजे यांनी राजा असुनही उपभोगाऐवजी कर्तृत्वाला व विलासी सुखासी जीवनऐवजी चारित्र्यासंपन्न संवेदनशील जीवनप्रवासाला प्राधान्य दिले. सदर शोधनिबंध हा करवीर संस्थांचा 19 व्या शतकाच्या पुर्वर्धात झालेला सर्वागींण व बहुमुल्य विकास आणि त्याचे मुख्य सुत्रधार म्हणजे शाहुराजे यांच्या वाटचालीवर भाष्य करणारा आहे. या शोधनिबंधातुन करवीर संस्थानाच्या क्रांतिकारी परिवर्तनामधील शाहुराजेंची भुमिका , योगदान, दृष्टीकोन व कर्तृत्वावर चर्चा करणारा आहे.

**मुख्य संशोधन प्रश्न व त्याचे उपप्रश्न :–**

या शोधनिबंधामध्ये करवीर संस्थानाचे शिल्पकार – राजर्षी शाहुराजे हा मुख्य संशोधन प्रश्न असुन व त्याचे उपप्रश्न पुढीलप्रमाणे

(अ) करवीर संस्थान व विकास कामे
(ब) शाहुराजे आणि कार्यपध्दती
(क) करवीर संस्थांनामधील राज्यकारभार
(ड) विकासकामे सुधारणाची विविध क्षेत्र

वरीलप्रमाणे उपप्रश्न सांगता येतात.

**संशोधन पध्दत :–**

सदर शोधनिबंधाच्या कार्यासाठी लेखनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दती ( ग्रंथ ,चरित्र, पुस्तक) यांचा आधार घेण्यात आला आहे.

**आधार सामुग्री प्राप्तीचे साधन :–**

सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी ग्रंथ, चरित्रेसोबत मासिके व वृत्तपत्रातील लेखांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विश्लेषण :–** करवीर संस्थानचे अधिपती ,राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांच्या सविस्तर जीवनक्रम पुढीलप्रमाणेः–

जन्म 26जुन 1874( घाटगे घराणे– कागल) स्थळ :– कोल्हापुर बावडा ( लक्ष्मीपॅलेस ) मुळनाव :– यशवंतराव, वडील जयसिंगराव , आई – श्रीमंत – राधासाहेब

दत्तक विधान :– 17 मार्च 1884 साली झाले. विवाह – 1 एप्रिल 1891 शिक्षण – राजकोट येथील राजपुत्र महाविदयालयात शिक्षण राज्याभिषेक :– 2 एप्रिल 1894 रोजी

1) **करवीर संस्थानमधील परिवर्तन सुधारणा( शिल्पकार भुमिका )**

**वसतिगृहे:–** कोल्हापुर (करवीर ) ही भारतभरात आज वसतिगृहाची जननी मानली जाते . याचे सर्वस्वी श्रेय शाहुराजेना देण्यात येते. सन1896ते 1921 याकालावधीत राजेनी सर्व जातीधर्माच्या विदयार्थ्यांना शिकता यावे यासाठी स्वतंत्र अशी सुमारे 20 वसतिगुह स्थापन केली व सुरळित चालवली. उदा दृ राजाराम हॉस्टेल (सन 1901 वीरशैव लिंगायत 1906, दैवज्ञ बोर्डिग 1908 , मुस्लिम बोर्डिग 1906

2) **अस्पृश्यता निर्मुलन कार्य :–** शाहुराजेंनी संस्थांनातील अमानुष अशी अस्पृश्यता निर्मुलनसाठी 26 जुलै 1902 रोजी मागासवर्गीयांसाठी नोकरीत 50टक्के जागा राखीव ठेवल्या. कोल्हपुर नगरपालिकेच्या अध्यक्षपदी एका मागासवर्गीय उमेदवारास संधी दिली. सन 1918 साली महारवतन नष्ट करून त्यांच्या जमीनी अस्पृश्य बांधवांना दिल्या.15 जानेवारी 1919 साली शाहु राजांनी कोल्हापुर संस्थांनात ''आजपासुन सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळली जाणार नाही'' असा आदेश काढला.

3)**उदयोग व कृषी :–** संस्थांनातील शेती व उदयोग यांची सांगड घालताना 1895 साली शाहुपुरी गुळ बाजारपेठ स्थापन केली. 1906 साली कोल्हापुर शाहु मिलची स्थापना केली. 1908 साली भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधले. गडहिंग्लज शिरोळ येथे जिनिंग फॅक्टरी सुरू केली. 1913 साली सहकारी चळवळीची पायाभरणी केली.

4) **महिला सबलीकरण :–** जुलै 1917 साली शाहुराजेंनी विधवा विवाहांस मान्यता देणारा कायदा संमत केला. 1918 साली आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा संमत केला. 1920 साली घटस्फोट कायदा व 1920 देवदासी प्रतिबंध कायदा संमत केला.यातुन स्त्रियांना स्वांतत्र समता व हक्कांची नवी संधी प्राप्त झाली.

5) **शैक्षणिक कार्य (सुधारणा ):–** शाहुराजे दरवर्षी संस्थांनात सुमारे 1 लाख रूपये खर्च करीत असत. 1911 साली संस्थांनात 15टक्के विदयार्थ्यांना नादारीची घोषणा झाली. 1913 साली सत्यशोधक समाजशाळा सुरू झाली. 1917 साली संस्थांनात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. 1912 साली व 1918 साली अनुक्रमे पाटील व तलाठी शाळांची स्थापना केली. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक व वैचारिक कार्याचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव होता.

6) **क्रांतिकारी कायदे :–** 1894 साली वेठबिगारीची पध्दत बंद करून इतर समाजघटकांना संस्थांनात नोक–या देण्यास सुरूवात केली. 1901 साली संस्थांनात गोवध बंदी कायदा केला. 1920 साली क्षात्रजगद्‌गुरूचे नवे पीठ सुरू केले. शाहुराजे प्रजाहितदक्ष प्रजावत्सल राजे होते. त्यांनी त्यांच्या 30 वर्षाच्या राज्यकारभारात बहुजनहिताय – बहुजनसुखाय या ब्रीद वाक्याला स्मरूण कारभार केला.

करवीर संस्थांनात , मैदाने , नाटयगृहे , संग्रहालये, व सांस्कृतिक केंद्रे स्थापन केली. कलाकार, खेळाडु, कलावंताना राजाश्रय दिला. सर्वतोपरी आर्थिक सहाय्य व पाठबळ दिले. संस्थान सुजलाम सुफलाम करण्यामध्ये त्यांचा वाटा व योगदान लक्षात घेता त्यांना करवीर संस्थानचे शिल्पकार असे म्हणतात.

**निष्कर्ष :–** 1) राजर्षी शाहु राजेनी करवीर संस्थानचा विकास व उभारणी आधुनिक धर्तीवर केला.

2) शाहुराजे व करवीर संस्थान हे नाते अतुट व भक्कम आहे कारण स्थायी कार्ये.

3) करवीर संस्थानचे प्रबोधन व परिवर्तन युग शाहुराजेंनी सुरू केले.

4) करवीर संस्थानात सामाजिक न्याय ,समता ,सत्यशोधक विचारसरणीची मुहुर्तमेढ रोवली गेली.

5) करवीर संस्थानातील शाहु राजेचे कार्य हे चिरस्थायी व बहुआयामी स्वरूपाचे आहे.हे कार्य सर्वस्पर्शी आहे.

6) लोकराजा मोठया दिलाचा राजा , कर्तबगार राजा , सुसंस्कृत शासक , करवीर संस्थानचे विकासपुरूष या सर्व उपाध्या व बिरूदे त्यांनी तंतोतंत सार्थ ठरवली.

**संदर्भ :–** 1) राजर्षी शाहु छत्रपती : एक मागोवा :– डॉ जयसिंगराव पवार

2) राजर्षी शाहु : वसा आणि वारसा – ॲड गोविंद पानसरे

3) लोकराजा शाहु महाराज : व्यक्तित्व आणि विचार :– धनंजय कीर